पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

**सभावृत्तांत**

**दिनांक – २२/०२/२०१९** **वेळ - सकाळी ११.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२२/०२/२०१९** रोजी **सकाळी ११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
४. मा.सुजाता सुनिल पालांडे
५. मा. गोफणे अनुराधा देविदास

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.५) मनपा क्रीडा प्रबोधिनी विद्यालयाकरिता मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्त करणेस मान्यता घेणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड शहरातील प्रेमलोक पार्क व्यायामशाळा चालविणेस देणेबाबत.- मा.अंबरनाथ कांबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) से.क्र.२५ सिंधूनगर,विठ्ठल रुक्मिणी मंदीर गार्डन प्राधिकरण निगडी येथील मनपाची सावित्रीबाई फुले व्यायामशाळा चालविणेस देणेबाबत. – मा.सुजाता पालांडे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) ओपनजीम साहित्य व इनडोअर जीम साहित्य खरेदी करणेबाबत.- मा.सुजाता पालांडे मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) मोरया गोसावी स्टेडीयम येथील बुध्दीबळ प्रशिक्षण केंद्र चालविण्यास देणेबाबत. – मा.अंबरनाथ कांबळे , मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) मोरया गोसावी क्रीडांगण येथे बॉक्सींग प्रशिक्षण केंद्र चालवण्यास देण्याबाबत.- मा.अंबरनाथ कांबळे, मा. सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) कै.मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा चिंचवड येथील वरील बाजूस असणा-या हॉल मध्ये टेबल टेनिस सेंटर सुरु करणेबाबत.- मा.सुजाता पालांडे , मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) क्रीडा विभागाच्या क्रीडा सुविधांवर सुरक्षा रक्षक मिळणेबाबत.- मा.सुजाता पालांडे , मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २२/०२/२०१८ ( सकाळी ११.३० वा.) ची पाक्षिक सभा सोमवार दिनांक २५/०२/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - सोमवार दिनांक २५/०२/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २२/०२/२०१९ ( सकाळी ११.३० वा.) ची तहकूब सभा **)**

दिनांक – **२५/०२/२०१९** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २२/०२/२०१९ ( सकाळी ११.३० वा.) ची तहकूब सभा सोमवार दिनांक **२५/०२/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.गोफणे अनुराधा देविदास
५. मा.अपर्णा निलेश डोके

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – ८५ विषय क्रमांक – ०१
दिनांक – २५/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/६३/२०१९ दि.६/२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१८-१९ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जिल्हा क्रीडा परिषद,पुणे व ६ खेळांच्या संबंधित क्रीडा संघटना यांचे संयुक्त विद्यमाने प्रस्तावात नमूद ६ नवीन खेळांच्या स्पर्धापैकी १) रग्बी = र.रु.३,४,१४/-,२) आटयापाटया= र.रु.१७,३४६/-, ३) टेनिक्वाईट= र.रु.१०,५१४/- व ४) सेपक टकरा =र.रु. २,७५०/- या ४ खेळ स्पर्धा झाल्या असून त्याकामी आलेला एकूण र.रु.३४,०२४/-(अक्षरी र.रु.चौतिस हजार चोवीस फक्त) सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८६ विषय क्रमांक – ०२
दिनांक – २५/०२/२०१९ विभाग – क्रीडा
सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/८१/२०१९ दि.१४/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाची प्रभाग क्र.१४ येथील प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर ही व्यायामशाळा अष्टविनायक महिला प्रतिष्ठाण मोहननगर,चिंचवड सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळाची मुदत दि.१०/०३/२०१९ रोजी संपुष्टात येत असल्याने व्यायामशाळेचा ठराव मंजूर झाल्यानंतर दि.११/०३/२०१९ पासून पुढे ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८७ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २५/०२/२०१९ विभाग – क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/१०३/२०१९ दि.१४/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाची प्रभाग क्र.१७ येथील गुरुवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा ही शिवशक्ती महिला बचत गट चिंचवड यांना सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळाची मुदत दि.१०/०३/२०१९ रोजी संपुष्टात येत असल्याने व्यायामशाळेचा ठराव मंजूर झाल्यानंतर दि.११/०३/२०१९ पासून पुढे ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८८ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २५/०२/२०१९ विभाग – क्रीडा

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/८२/२०१९ दि.१४/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाची प्रभाग क्र.९ येथील खराळवाडी पुरुष व्यायामशाळा हि कामगारनगर मित्र मंडळ कामगारनगर यांना सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळाची मुदत दि.२८/०२/२०१९ रोजी संपुष्टात येत असल्याने व्यायामशाळेचा ठराव मंजूर झाल्यानंतर दि.०१/०३/२०१९ पासून पुढे ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ८९ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २५/०२/२०१९

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उद्यमनगर,पिंपरी-१८ येथे क्रीडा प्रबोधिनी विद्यालय चालविली जाते. क्रीडा प्रबोधिनी विद्यालयात क्रीडा शिक्षणाबरोबर इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत अध्यापन कार्य चालते. क्रीडा प्रबोधिनी विद्यालयात ॲथेलिटक्स,खो-खो,कबड्डी, बॉक्सिंग,सॉफ्टबॉल इ.खेळांचा नियमित सराव घेतला जातो. या विद्यालयात उन्हाळयामध्ये उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर आयोजित केले जाते. सदर विद्यालयातून अनेक राज्य व राष्ट्रीय खेळाडू तयार झालेले आहेत. सन २०१८-१९ मध्ये क्रीडा प्रबोधिनील विद्यालयातील शालेय विद्यार्थी यांनी,विविध क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला होता. यामधून एकूण १०२ विद्यार्थी खेळाडू विभागस्तर शालेय क्रीडा स्पर्धेत, १८ विद्यार्थी खेळाडू राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेत , ३ विद्यार्थी खेळाडू राष्ट्रीयस्तर शालेय क्रीडा स्पर्धेत चमकले आहेत. सन २०१८-१९ मध्ये क्रीडा प्रबोधिनी विद्यालयास राष्ट्रीय स्तरावर १ सुवर्ण व १ कास्य पदक प्राप्त झालेले आहे. क्रीडा प्रबोधिनी विद्यालयात सन २०१८-१९ या वर्षात एकूण २६७ विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना विविध खेळांचे विशेष मार्गदर्शन देण्यासाठी उच्च क्रीडा कौशल्य असलेल्या,तज्ञ क्रीडा मार्गदर्शकाची आवश्यकता आहे. परंतु संध्या क्रीडा प्रबोधिनी विद्यालयातील विद्यार्थी संख्येचा विचार करता फक्त ४ क्रीडा मार्गदर्शक आहेत. मनपा क्रीडा प्रबोधिनी विद्यालयाकरीता खालीलप्रमाणे खेळ निहाय क्रीडा मार्गदर्शकांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | खेळ प्रकार | आवश्यक क्रीडा मार्गदर्शक संख्या |
|---|---|---|
| १ | कबड्डी | ०१ |
| २ | खो खो | ०१ |
| ३ | ॲथेलेटिक्स | ०१ |
| ४ | योगा | ०१ |
| ५ | हॉकी | ०१ |

तरी मनपा क्रीडा प्रबोधिनी विद्यालयाकरीता कबड्डी,खोखो,ॲथेलेटिक्स,योगा,हॉकी या खेळासाठी योग्य त्या मानधनावर प्रत्येकी १ प्रमाणे एकूण ५ क्रीडा मार्गदर्शक यांची ६ महिन्या करीता नियुक्तीची कार्यवाही माध्यमिक शिक्षण विभागाकडून करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९०	विषय क्रमांक – ०६

दिनांक – २५/०२/२०१९

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे	अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड शहरातील प्रेमलोक पार्क व्यायामशाळा निसर्गरत्न मित्र मंडळ यांना ११ महिने कराराने व्यायामशाळा रक्कम रुपये २०००/- महापालिकेडून घेवून चालविणेस देणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. . सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९१	विषय क्रमांक – ०७

दिनांक – २५/०२/२०१९

सुचक – मा.सुजाता पालांडे	अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सुजाता पालांडे ,मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

मनपाची भोसरी सदगुरुनगर येथील मनपाची व्यायामशाळा ज्योतिबा स्वंयरोजगार सहकारी संस्था यांना ११ महिने कराराने र.रु.२०००/- सेवाशुल्क महापालिकेकडून घेवून चालविणेस देणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. . सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९२	विषय क्रमांक – ०८

दिनांक – २५/०२/२०१९

सुचक – मा.सुजाता पालांडे	अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सुजाता पालांडे ,मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क्रीडा विभागाकरीता सन २०१८-१९ करीता अंदाजपत्रकीय तरतूद र.रु.१,१०,००,०००/- शिल्लक असून वाढीव निधी र.रु.५०,००,०००/- मिळणार असून सदर लेखाशिर्षातून ओपन जीम साहित्य वॉर्ड क्र.१८ मध्ये खरेदी करुन बसविणेकामी र.रु.५०,००,०००/- पर्यंत पिंपरी व चिंचवड विधानसभा अंतर्गत एकूण ९ इनडोअर १.बाबूराव भांडे व्यायामशाळा,पिंपळे निलख २.शेवंताबाई काशीद व्यायामशाळा,पिंपळे गुरव ३.वैदूवस्ती व्यायामशाळा, पिंपळे गुरव ४.सांगवी गावठाण महिला व्यायामशाळा ५.धोंडीबा ढोरे व्यायामशाळा,सांगवी ६.रहाटणी गावठाण व्यायामशाळा भैरवनाथ मंदिर ७.वाल्हेकरवाडी व्यायामशाळा ८. काळेवाडी व्यायामशाळा ९. छ.शाहू महाराज व्यायामशाळा,प्रेमलोक पार्क,चिंचवड या व्यायामशाळांमध्ये अद्ययावत व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेकामी र.रु.१,१०,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मंजूरी देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९३ विषय क्रमांक – ०९

दिनांक – २५/०२/२०१९

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये बुध्दीबळ खेळाचा विकास व्हावा व प्रसार व्हावा याकरीता मोरया गोसावी स्टेडिअम येथील बुध्दीबळ केंद्र पिंपरी चिंचवड महानगरचेस असो.या संस्थेस नाममात्र दरावर चालविण्यासाठी देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९४ विषय क्रमांक – १०

दिनांक – २५/०२/२०१९

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये बॉक्सींग खेळाचा विकास व्हावा व प्रसार व्हावा याकरीता मोरया गोसावी क्रीडांगण येथील बॉक्सींग केंद्र भक्ती शक्ती प्रतिष्ठान या संस्थेस चालविण्यासाठी देणेस मान्यता देणेत येत आहे. . सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९५ विषय क्रमांक – ११

दिनांक – २५/०२/२०१९

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अंबरनाथ कांबळे, यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये टेबल टेनिस खेळाचा विकास व्हावा व प्रसार व्हावा याकरीता कै.मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा चिंचवड येथील वरील बाजूस असणा-या हॉलमध्ये टेबल टेनिस सेंटर भक्ती शक्ती प्रतिष्ठान चिंचवड या संस्थेस नाममात्र दरावर चालविण्यासाठी देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९६ विषय क्रमांक – १२

दिनांक – २५/०२/२०१९

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अंबरनाथ कांबळे, यांचा प्रस्ताव.

क्रीडा विभागाच्या क्रीडा सुविधांवर प्रभागानुसार सदर ठिकाणी सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व
सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२०/२०१९
दिनांक : २६/०२/२०१९

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc